# घटक : १ अक्षर वाङ्मयाचा गुणविशेष

## अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टिपा
१.३ उताऱ्याचे अध्ययन
- १.३.१ पहिल्या भागाचे वाचन, मनन आणि मुद्दे
- १.३.२ ललित लेखकाची आकांक्षा
- १.३.३ दुसऱ्या भागाचे वाचन, मनन आणि मुद्दे.
- १.३.४ अक्षर वाङ्मयाचे महत्त्व.
- १.३.५ तिसऱ्या भागाचे वाचन, मनन आणि मुद्दे.
- १.३.६ ललितकला आणि मनोधर्म.
- १.३.७ ऐतिहासिक 'सत्य' आणि साहित्यातील 'सत्य'.
- १.३.८ ललित वाङ्मयाच्या वाचनाने आनंद का होतो?
- १.३.९ चौथ्या भागाचे वाचन, मनन आणि मुद्दे.
- १.३.१० अक्षर वाङ्मयाची खरी कसोटी.

१.४ नमुना उत्तरे.
१.५ अधिक अध्ययन.
- १.५.१ ना.सी. फडके यांची प्रतिपादन-पद्धती व शैली.
- १.५.२ फडके यांची शब्दकळा- भाषाभ्यास.
- १.५.३ पुनःप्रत्ययाचा सिद्धांत.
- १.५.४ लेखक परिचय
- १.५.५ साहित्यातील 'शाश्वता' विषयी प्रा.दि.के. बेडेकर

१.६ सारांश
१.७ सरावासाठी स्वाध्याय.
१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

काही साहित्य हे असे असते की सकाळी वाचले की संध्याकाळी संपते; काही आज वाचले तर उद्या संपते. काही एखादी पिढी टिकते. मात्र काही साहित्यकृती अशा असतात की त्यांना काळाचा स्पर्शच होऊ शकत नाही. त्यांची गोडी सदैव कायम राहते. हे वाङ्मय अजरामर का होते, ते प्रस्तुत लेखातून आपणांस पाहावयाचे आहे. अध्ययनानंतर तुम्हांस

(अ) जगातील काही अक्षर वाङ्मयकृतींचा परिचय होईल,

(आ) अक्षर वाङ्मयाचे अक्षरत्व कशात असते, ते समजेल,

(इ) अक्षर वाङ्मयास देश-कालादींचा अडसर नसतो, ते का ते ध्यानी येईल,

(ई) अक्षर वाङ्मयाने होणाऱ्या आनंदाचे स्वरूप पाहता येईल,

(उ) ना.सी. फडके यांच्या प्रतिपादन शैलीचे विशेष अभ्यासता येतील.

## १.१ प्रास्ताविक

कालिदास, शेक्सपियर, भवभूती, टागोर यांचे साहित्य जगात सर्वत्र वाचले जाते. देश, भाषा, धर्म, जात इत्यादी गोष्टी कितीही वेगळया असल्या तरी त्या या साहित्य प्रेमाच्या आड येत नाहीत. हया साहित्याचे विश्‍व सार्वजनीन - म्हणजे सर्व जनांचे असते; तसेच ते सार्वकालिक - म्हणजे तिन्ही काळांचे असते. ना. सी. फडके यांनी या अशा अक्षर वाङ्मयाचा गुणविशेष येथे सुस्पष्ट करून दाखविला आहे.

## १.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टिपा

अक्षर- अ = नाही, क्षर = झीज; जे झिजत नाही, नष्ट होत नाही असे.

अजरामर - अजर + अमर.

अजर = ज्याला जरा म्हणजे वार्धक्य, म्हातारपण नाही.

अमर = ज्याला मरण नाही.

अजरामर = ज्याला वार्धक्य नाही, मृत्यू नाही असे.

तेजोवलय-प्रकाशाचे वर्तुळ.

आबालवृद्ध - आ + बाल + वृद्ध. आ = पासून. बालापासून ते वृद्धापर्यंत.

लोलुपता - आसक्ती, मोह.

लांछनमुद्रा - कलंक किंवा दोष, याचा ठसा.

अमोलिक - अ म्हणजे नाही, मोल ज्याचे, अमूल्य; मौल्यवान.

वैषम्य- विषमता, वेगळेपणा.

रसिकाग्रणी- रसिक + अग्रणी. रसिकश्रेष्ठ.

सहृदय मनुष्य - भावना असणारा मनुष्य : रसिक मनुष्य.

ध्वन्यर्थ - ध्वनि + अर्थ. सूचित होणार अर्थ.

लोकभ्रम - लोकात रूढ झालेला चुकीचा समज.

अनाद्यनंत - अन्+आदि + अंत - प्रारंभ नसलेला आणि शेवट नसलेला.

पुनरावृत्ती - पुनः तेच घडणे, होणे. (पुनः + आवृत्ती)

पुनःप्रत्यय - पुनः + प्रत्यय = पुन्हा अनुभव येणे.

उपरिनिर्दिष्ट - उपरि + निर्दिष्ट = वर दाखविलेले, सांगितलेले.

स्थलकालनिरपेक्ष - स्थल + काल + निरपेक्ष = स्थल व काल यांची अपेक्षा नसलेले; देशकालाच्या पलीकडले.

युक्तायुक्त - युक्त+अयुक्त = योग्य आणि अयोग्य.

समानधर्मा- समान आहे धर्म म्हणजे स्वभाव, आवड, रूची असा.

स्वयंसिद्ध - स्वयं म्हणजे स्वतःच सिद्ध म्हणजे तयार असणारा.

विकार - मनोभावना.

व्यक्तिनिष्ट - व्यक्तीचा, व्यक्तीवर अवलंबून असणारा.

व्यक्तिनिरपेक्ष - व्यक्तीवर अवलंबून नसणारा, व्यक्तीची अपेक्षा नसलेला.

सुष्ट - चांगला.

अविच्छिन्न-अ + (विछिन्न म्हणजे फोडलेला, तुकडे तुकडे झालेला.)-अविच्छिन्न अखंड, अभंग.

अक्षर वाङ्मयाचा गुणाविशेष.

## १.३ उताऱ्याचे अध्ययन

अध्ययनासाठी मूळ लेखाचे विभाग केले आहेत. प्रत्येक भागाखाली प्रश्न दिलेले आहेत. त्याची उत्तरे तुम्हांस देता येतील. अध्ययन संपल्यावर तुम्ही आपली उत्तरे सुचविलेल्या नमुना-उत्तरांशी पडताळून पाहा-

### १.३.१ पहिल्या भागाचे वाचन, मनन आणि मुद्दे

एका सुप्रसिद्ध संस्कृत नाटककाराने म्हणे असे उद्गार काढले आहेत, की 'माझ्या ललितकृतीतील मर्म ओळखणारा रसिक मला आज लाभला नाही तरी काही हरकत नाही. पुढे केव्हा तरी आणि कोठे तरी असा रसिक खचित निघेल.

या उद्गारांबद्दल विचार करता परवा सहज माझ्या मनात आले, समजा, या नाटककाराला कोणी म्हटले असते, 'अहो, कविराज, आपणाला जी कीर्ती हवी ती अगदी आजच्या पिढीत रोख मिळेल अशी आम्ही हमी घेतली, तर मग पुढच्या पिढीत आपलं नावही कुणाच्या स्मरणात राहिले नाही तर चालेल का आपल्याला ! आजच्या पिढीने आणखी पुढच्याही पिढीने आपली महती गावी हे जरासं कठीण आहे. वर्तमानकाळात तरी आपलं नाव होईल, किंवा भावी कालात तरी. कोणता काल आपण पसंत करता ? बोला.'

तर या प्रश्नाला त्या संस्कृत नाटककाराने काय उत्तर दिले असते ते सांगणे कठीण आहे.

कारण, आज घटकेला आपले नाव झाले की बस्स झाले, भावी कालात आपल्या ग्रंथांचा जगाला विसर पडला तरी काही हरकत नाही, अशी ललितलेखकाच्या मनाची तयारी असणे क्वचितच संभवते.

आपल्या कृती वर्तमानकाळात तर लोकप्रिय व्हाव्याच, पण पुढेही त्यांची लोकप्रियता निरंतर कायम राहावी असेच कोणत्याही ललितलेखकास साहजिकच वाटत असते. अक्षर वाङ्मयात (Classical Literature) आपल्या कृतीची गणना व्हावी अशी त्याची महत्त्वाकांक्षा असते. कारण, 'अक्षर वाङ्मय' ही एक मोठी बहुमानाची पदवी आहे. इतर कोणत्याही पारितोषिकापेक्षा या पदवीची लालसा ललितलेखकास अधिक वाटते. त्याच्या कृतीचे परीक्षण करताना कोणी जर असे म्हटले, की 'याचे लेखन फार सुंदर व आकर्षक आहे यात संशय नाही; परंतु ते कायमचे टिकणार नाही, अक्षर वाङ्मयात त्याचा समावेश होणार नाही.' तर त्याच्या अंतःकरणाला यातना होतात. आपण जे लिहितो ते 'आज चमकले उद्या मालवले' अशा कोटीत पडू नये असे त्याला वाटत असते. आपल्या ललित कृती जशा आज तसेच उद्याही आणि परवाही, निरंतर वाचकांची मने आकर्षित करून घेण्यास समर्थ राहाव्यात अशी त्याच्या मनातली तळमळ असते. तारुण्य,वार्धक्य आणि मृत्यू या प्रत्येक सृष्ट वस्तूच्या ठरलेल्या अवस्था आहेत हे माहीत असूनही ललितलेखकास वाटत असते, की आपल्या कृतींना वार्धक्य कधी येऊ नये - मग मृत्यूची गोष्ट तर दूरच ! आपण जे जे लिहिले ते ते सदैव ताजे आणि तरूणच राहावे ! त्याला मरण नसावे, त्याला जराही कधी येऊ नये ! ते अजरामर, 'अक्षर' ठरावे !

**खालील मुद्दे लक्षात घ्या**

१ ललितलेखकाला रसिकाचा प्रतिसाद हवा असतो.
२ आपली ललितकृती 'अक्षर' ठरावी ही त्याची इच्छा.

### १.३.२ ललित लेखकाची आकांक्षा

कोणत्याही ललितलेखकास आपल्या साहित्यकृती वर्तमानकाळात तर लोकप्रिय व्हाव्यात पण पुढेही त्यांची लोकप्रियता निरंतर कायम राहावी असे वाटणे, कसे साहजिक आहे, हे या भागात ना.सी. फडके यांनी स्पष्ट करून दाखविले आहे. त्यासाठी त्यांनी प्रारंभीच्या, संस्कृतमधील एका थोर नाटककार भवभूती यांच्या वचनाचा आधार दिला आहे. (टीप पाहा.)

ललितलेखकाला आपली साहित्यकृती 'अजरामर' आणि 'अक्षर' व्हावी, असे का वाटते ? 'अक्षर वाङ्मय' ही एक मोठी बहुमानाची पदवी आहे, हे त्याचे कारण होय.

अक्षर वाङ्मय हे लोकप्रियही असते आणि अजरामरही असते. केवळ वर्तमानकालात लोकप्रिय होणारे वाङ्मय 'आज चमकले, उद्या मालवले' या जातीचे असते; असा दोन्हीतला भेद फडके यांनी दाखविला आहे.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न**

(क) रिकाम्या जागा भरा.

१. अक्षर वाङ्मय ही एक मोठी ----------- पदवी आहे.

२. कोणत्याही ललितलेखकास वाटते की आपली साहित्यकृती ही ------------ठरावी; ती ---------ठरावी !

(ख) पुढील प्रश्नांची उत्तरे द्याः

१. ललितलेखकास आपले वाङ्मय अक्षर ठरावे असे वाटते हे पटविण्यासाठी फडके यांनी कोणाचे वचन दिले आहे ?

..........................................................................................

..........................................................................................

२. वर्तमानकाळातच केवळ लोकप्रिय ठरणाऱ्या वाङ्मयाचे वर्णन फडके यांनी कोणती म्हण वापरून केले आहे ?

........................................................................................................................................

........................................................................................................................................

### १.३.३ दुसऱ्या भागाचे वाचन, मनन आणि मुद्दे.

ललितलेखकाला असे वाटले याचे कारण काही ललितकृती अक्षर झाल्याचा प्रत्यक्ष पुरावा त्याच्यापुढे असतो. हजारो वर्षांपूर्वी होउन गेलेल्या ललितलेखकांच्या नावाभोवतालचे तेजोवलय अजूनही कायम असल्याचे त्याला दिसते. कालिदास, भास ,भवभूती इत्यादींच्या प्रतिमा अजूनही रसिकांच्या अंतःकरणाच्या चौकटीत विराजत असलेल्या तो पाहतो. त्यांच्या विविध ललितकृती सर्वस्वी निर्दोष नव्हत्या असे त्याची चिकित्साबुद्धी त्याला सांगत असते; आणि उलट, त्या ललित-कतीबद्दल अजूनही आबालवृद्ध वाचकांना मनस्वी लोलुपता वाटते याचा तर त्याला प्रत्यही प्रत्यय येत असतो. त्यामुळे तो साहजिकच विचार करू लागतो, की 'ज्या गुणांच्या योगाने या कलावंतांनी मानवी अंतःकरण कायमचे वश करून ठेवले ते गुण तरी कोणते ? असा कोणता अमृततुल्य गुण आहे, की ज्याचे लवमात्र सिंचन होताच ललितकती अजरामर होतात अक्षर वाङ्मयाचे अक्षरत्व आहे तरी कशात ?'

साहित्यचर्चेच्या दृष्टीने हा प्रश्न खरोखरच फार महत्त्वाचा आहे. आमचे टीकाकार 'अक्षर वाङ्मय'(Classical Literature) हा शब्दप्रयोग हरघडी वापरतात; परंतु त्यांनी तरी वरील प्रश्नाचा निर्णय आपल्या मनाशी कधी केलेला असतो किंवा नाही कोण जाणे ! बहुतांशी नावडतीचे मीठ आळणी ठरविणाऱ्या राणीप्रमाणे जे आपल्याला रुचत नाही ते निकालात काढण्यासाठी 'याची गणना अक्षर वाङ्मयात करता येणार नाही' अशी लांछनमुद्रा तयार करून टीकाकार आपल्या संग्रही ठेवतात. मला वाटते, या प्रकाराबद्दलचाच संताप व्यक्त करण्यासाठी सुप्रसिद्ध जर्मन कवी गॉएटे आपल्या तरूणपणी एका माणसाकडे बोट दाखवून म्हणाला, 'Kill this dog. He is a reviewer!' हे तीव्र उद्गार समर्थनीय असोत वा नसोत; एवढे खास, की ज्या दिव्य गुणांमुळे ललितकृती 'अक्षर' होतात त्या गुणांचे स्वरूप स्वतः लेखकांनी, वाचकांनी व टीकाकारांनी थोडे फार समजून घेतल्यास ते आपल्या मराठी साहित्याच्या वाढीस पोषक होईल.

प्रत्येक राष्ट्राने आपल्या मायभाषेतील काही ललित कृतींचे मोठया प्रेमाने रक्षण केलेले असते. त्या राष्ट्रावर आलेल्या विविध आपत्तीतून या निवडक ललितकृती सुरक्षित राहिलेल्या असतात. राष्ट्राच्या राज्यपद्धतीत अनेक क्रांत्या होऊन जातात, धर्मसंस्थेत बदल होतात, सामाजिक जीवनात स्थित्यतर घडून येतात, लोकांची राहणी आणि विचारसरणी पालटते, पण या वेचक ललितकृतींवरचे लोकांचे प्रेम अव्याहत टिकलेले असते. या ललितकृतींना एकप्रकारे राष्ट्रीय संपत्तीचे स्वरूप प्राप्त होते आणि राष्ट्राच्या संस्कृतीतील एक अमोलिक भाग अशा भावनेने राष्ट्रांतील आबालवृद्ध स्त्रीपुरूष त्यांच्याकडे पाहू लागतात. याच दृष्टीने कार्लाईलने आपल्या एका निबंधात असे उद्गार काढले आहेत की, 'इंग्रज लोक एक वेळ आपला इंग्लंड देश गमवण्यास तयार होतील, परंतु शेक्सपियरची नाटके ते नेहमी प्राणापलीकडे जपल्यावाचून राहणार नाहीत !'

प्रत्येक राष्ट्राचे असे लाडके शेक्सपियर असतात. त्या ललितलेखकांच्या कृतीत त्या राष्ट्रातील स्त्रीपुरूषांना वाटणारी गोडी कधी संपत नाही.

इतकेच नव्हे, तर एका राष्ट्रांत अमरत्व पावलेल्या ललतिकृती भाषा-भिन्नत्वाची अडचण दूर करून दुसऱ्या राष्ट्रातील वाचकांनी जर वाचल्या, तर त्यासुद्धा 'अक्षरवाङ्मयां' अंतर्भूत होण्यास त्या कृती सर्वथा लायक आहेत अशी कबुली आनंदाने दिल्यावाचून राहात नाहीत. अशा वेळी इतर सर्व प्रकारचे भिन्नत्व विसरून निरनिराळया राष्ट्रांतील स्त्रीपुरुष 'वाचक' या एकाच सामान्य अधिनिष्ठानावर उभे राहू शकतात. इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील राजकीय विषमभावाची गोष्ट सोडली, तरी त्या दोन देशांतील रहिवाशांत इतर वैषम्ये काय थोडी आहेत ? इंग्रज लोकांचा व आपला धर्म एक आहे, का नीतिनियम एक आहेत, का सामाजिक जीवनाचा दृष्टिकोन एक आहे ? त्यांची आपली या कोणत्याच बाबतीत एकवाक्यता नाही. आज नाही, आणि पुढे कधी होणे शक्य म्हणता येत नाही. पण असे असूनही शेक्सपियरची नाटके अलौकिक आहेत, आणि 'अक्षर वाङ्मय' या बहुमानानेच त्यांचा गौरव केला पाहिजे, या विधानात त्यांचे व आपले एकमत होते. कोठे हिंदुस्थान आणि कोठे जर्मनी ? उभयतांचे इतिहास निराळे, धर्म निराळे, आचारविचार निराळे, राष्ट्रीय आणि सामाजिक जीवनांतील प्रश्नही निराळे; तथापि, कालिदासाचे 'शाकुंतल' वाचताच एखाद्या भारतपुत्राप्रमाणेच त्या सातासमुद्रपलीकडच्या 'हूण' देशातील एक रसिकाग्रणी अवर्णनीय हर्षाने वेडा होऊन नाचू लागतो.

हे लक्षात घेता आपल्याला असे सुद्धा म्हणावे लागेल, की ज्या ललितकृती अमर म्हणून एका राष्ट्राकडून जतन झालेल्या असतात, त्या कोणत्याही राष्ट्राने केव्हाही जतनच कराव्यात अशा योग्यतेच्या असतात. केवळ, त्याच एका विवक्षित राष्ट्राला त्यांच्याविषयी आपुलकी वाटावी असे नव्हे, तर एकंदर मानवजातीला त्यांविषयी जिव्हाळा वाटावा असा काहीतरी गुण त्यांच्या ठिकाणी असतो. मनुष्यामनुष्यांत जे अनेक भेद प्रसंगोपात व स्थलपरत्वाने निर्माण झाले आहेत त्यांच्या गढूळ पाण्याखाली कमलपत्राप्रमाणे शोभणारे अखिल मानवजातीच्या अंतःकरणाचे एकत्व असल्याची साक्ष

पटविणाऱ्या गोष्टी या विचित्र संसाराच्या व्यवहारात फार थोडया आहेत. पण त्या थोडया गोष्टीतील अतिशय महत्वाची आणि अतिशय प्रभावी कोणती असे विचारले, तर 'अक्षर वाङ्मया' च्या पदवीला पोचलेल्या ललितकृतींची परंपरा असेच उत्तर द्यावे लागेल.

अक्षर वाङ्मयाचा गुणविशेष.

वरील भागाचे नीट आकलन झाल्यावर खालील मुद्दे लक्षात येतील.

१) ललितलेखकासमोर 'अजरामर' कलाकृतींचे आदर्श असतात.
२) 'अक्षरत्व' म्हणजे काय या प्रश्नाचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.
३) अक्षरवाङ्मय ही राष्ट्राची संपत्ती आहे.
४) अक्षरवाङ्मयाचा मानवजातीवर विलक्षण प्रभाव पडतो. अखिल मानवजातीच्या अंतःकरणाचे एकत्व असल्याची साक्ष अक्षर वाङ्मयाने पटते.

## १.३.४ अक्षर वाङ्मयाचे महत्त्व.

या दुसऱ्या भागात ललितलेखकास आपली साहित्यकृती अजरामर व्हावी असे का वाटते याचे आणखी एक कारण दिले आहे. अशा अजरामर झालेल्या ललितकृती लेखकाच्या प्रत्यक्ष समोर असतात तेव्हा अस्सल साहित्यकृती अमर-अक्षर ठरतात याचा पुरावा त्याच्या पुढे असतो. अक्षरवाङ्मयाचे अक्षरत्व कशात असते असा प्रश्न या भागाच्या शेवटी फडके यांनी उपस्थित केला आहे.

अक्षर वाङ्मयाचे अक्षरत्व कशात आहे याचा समीक्षकांकडून जाणीवपूर्वक, गंभीरतेने विचार केला जात नाही अशी तक्रार येथे फडके यांनी केली आहे. त्यासाठी त्यांनी जर्मन कवी गॅाएटे यांचे समीक्षकासंबंधी एक वचन उद्धृत केले आहे- 'Kill this dog. He is a reviewer'- भावार्थ असा की 'समीक्षक हा चावणाऱ्या कुत्र्यासारखा असतो. कुत्र्यासारखे त्याला ठार करा'....... 'नावडतीचे मीठ आळणी' ही म्हणही फडके यांनी येथे या संदर्भात वापरली आहे.

फडके यांचे हे विचार सहृदय रसिक टीकाकारांसंबंधीचे नाहीत; अरसिक, अहंमन्य, समीक्षकासंबंधीचे आहेत हे स्पष्ट आहे.

समीक्षक किंवा टीकाकार बाजूस ठेवले तर काय अनुभव येतो, ते येथे फडके सांगत आहेत. रसिक वाचकांनी अक्षर वाङ्मय प्रेमाने जतन केले आहे, इतके की ती आपली बहुमोलाची राष्ट्रीय संपत्ती आहे, असेच त्यांनी मानले आहे, असे फडके सांगतात. अक्षर वाङ्मय हा राष्ट्राच्या संस्कृतीतील एक अमोलिक भाग आहे, हे पटवून देण्यासाठी फडके यांनी कार्लाईलचे एक वचनही दिले आहे. (टिपा पाहा.)

"राष्ट्रजीवनात सर्वप्रकारचे बदल घडून येतात पण रसिकांच्या या अक्षर वाङ्मयावरील प्रेमात बदल होत नसतो."

अक्षर वाङ्मयाचे लेखक हे त्या राष्ट्राचे लाडके लेखक असतात. शेक्सपियर हा असाच एक लाडका लेखक. 'शेक्सपियर' हे विशेषनाम 'अजरामर लेखक' या सामान्य अर्थाने वापरून फडके यांनी एक सुंदर विधाने केले आहे-

'प्रत्येक राष्ट्राचे असे लाडके शेक्सपियर असतात'.

प्रत्येक राष्ट्राचे असे लाडके शेक्सपियर असतात, हे खरे; पण शेक्सपियर हा केवळ इंग्लंडचाच लाडका आहे असे नाही; तो सर्व राष्ट्रांचा लाडका आहे. देश, धर्म, भाषा, संस्कृती यांतील भिन्नता, विषमता या प्रेमाच्या आड येत नाही. अक्षर वाङ्मय हे देशकालातीत असते. फडके यांनी जर्मन कवी गॅाएटे यांचे यासाठी सुंदर उद्गार उद्धृत केले आहेत. (टिपा पाहा.)

या भागात फडके यांनी अक्षर वाङ्मया चा परमोच्च गौरव केला आहे. अनेक भेदांनी युक्त असलेल्या मनुष्यामनुष्यांत त्यांच्या अंतःकरणाचे एकत्व असल्याची साक्ष पटवणाऱ्या ज्या थोडया गोष्टी आहेत त्यात अक्षर वाङ्मयाइतकी प्रभावी व महत्त्वाची दुसरी कोणतीही गोष्ट नाही, असे फडके म्हणतात.

एक सुंदर अलंकार योजून फडके हे स्पष्ट करतात ........

मनुष्यामनुष्यांतील भेद.......म्हणजे गढूळ पाणी.

अक्षरवाङ्मय .........म्हणजे या गढूळ पाण्यातून येणारे कमलपत्र.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(ग) रिकाम्या जागा भरा

१. विविध ललितकृती सर्वस्वी..........नसल्या तरी त्या कृतींबद्दल अजूनही..........वाचकांना मनस्वी.........वाटत असते, याचा ललितलेखकाला प्रत्यही...........येत असतो.

२. ........ ........ ......... इत्यादींच्या प्रतिमा अजूनही रसिकांच्या........ चौकटीत......... असलेल्या त्या ललितलेखकास दिसत असतात.

(घ) समीक्षकांची वृत्ती दर्शवण्यासाठी प्रा. फडके यांनी कोणती म्हण, कोणते वचन उपयोजिली आहेत ?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

(ङ) फडके यांना गॉएटेचे उद्‌गार मान्य आहेत का?

......................................................................................................................................................

......................................................................................................................................................

(च) पुढील वाक्ये पूर्ण करा-

(१) प्रत्येक राष्ट्राचे असे लाडके शेक्सपियर असतात. भारताचे लाडके शेक्सपियर म्हणजे...............

(२) राष्ट्रजीवनात बदल होतात-उदा

राज्यपद्धतीत........

धर्मसंस्थेत...........

सामाजिक जीवनात............

लोकांची राहणी, विचारसरणी.........

पण रसिकांच्या......................

(छ) एका वाक्यात उत्तरे द्या.

(१) इंग्लंड आणि हिंदुस्थान यामध्ये कितीतरी भिन्नता आहे. उदाहरणार्थ धर्म. याप्रमाणे भिन्नतेच्या इतर गोष्टी कोणत्या ?

(२) राष्ट्राराष्ट्रात अनेक प्रकारची विषमता व भिन्नता असली तरी एका बाबतीत त्यांच्यात मतभिन्नता नसते. ती बाब कोणती ?

(ज) रिकाम्या जागा भरा

मनुष्यामनुष्यात जे अनेक भेद .........व............ निर्माण झाले आहेत त्यांच्या.........पाण्यावरती......... शोभणारे वाङ्मय म्हणजे ...........होय !

## १.३.५ तिसऱ्या भागाचे वाचन, मनन आणि मुद्दे.

प्रथम दर्शनी या प्रकारचे कितीही आश्चर्य वाटले, तरी थोडयाशा विचाराअंती ते सहज नाहीसे होण्यासारखे आहे. देशपरत्वे मनुष्यामनुष्यांत अनेक भेदभाव निर्माण होतात खरे; परंतु मानवी अंतःकरणाचे काही धर्म असे आहेत, की त्यांस अविनाशी म्हटले पाहिजे. राग, द्वेष, वात्सल्य, प्रणय, असूया, लोभ, अंहकार इत्यादी विकार मनुष्यमात्राच्या अंतःकरणात कोठेही आणि केव्हाही असणारच. हे विकार प्रगट होण्याच्या तऱ्हा भिन्न भिन्न असतील; परंतु, त्यांचे मूलस्वरूप म्हणून काही तरी आहे, आणि ते शाश्वत आहे. मानवी संसारांतील सारी लहान मोठी सुखदुःखे या विकारांच्या क्रियाप्रतिक्रियेतूनच निर्माण होत असतात, व त्यांमुळे या सुखदुःखांचा बाह्य आकार जरी स्थलकालपरत्वे बदलला, तरी त्यांचेही मूलस्वरूप शाश्वत आणि अचल असते. अमर ठरलेल्या ललित कृती या शाश्वत आणि सर्वसामान्य मनोधर्माच्या आणि सुखदुःखांच्या अधिष्ठानावर उभ्या असतात, म्हणूनच त्यांपासून मिळणारा आनंद कोणाही सहृदय मनुष्यास केव्हाही मिळू शकतो, आणि त्या ललितकृती जरामरणाच्या पलीकडे जाऊन बसतात. 'इतिहासात सन आणि नावे याखेरीज काही खरे नसते; उलट नाटकात अगर कादंबरीत सन आणि नावे याखेरीज सर्व गोष्टी खऱ्या असतात' असे जे एका पंडिताने म्हटले आहे त्यात मोठे मर्म आहे. कारण, या उद्‌गारात सहजासहजी ललित वाङ्मयाच्या प्रधान हेतूविषयी आणि अस्सल स्वरूपाविषयी एक मोठे महत्त्वाचे सूत्र ग्रथित झालेले आहे. नाटकात आणि कादंबऱ्यात ज्या व्यक्तींच्या आयुष्यातील विविध प्रसंग चित्रित झालेले असतात त्या व्यक्ती कपोलकल्पित समजण्याची' वहिवाट आहे. (कपोलकल्पित हा वाक्प्रचार कसा रूढ झाला कुणास ठाऊक ? वास्तविक कपोल या शब्दाचा अर्थ गाल. गालाने मनुष्य कल्पना करतो असे समजणे म्हणजे मानसशास्त्राची परमावधीची विकृती होय. तेव्हा लोकांनी अविचाराने फार दिवस वापरलेला हा 'कपोल' भाषाशुद्धीच्या दृष्टीने आपण आता सोडून देऊ; आणि असे म्हणू, की ललितवाङ्मयांतील व्यक्ती आणि प्रसंग लोक सामान्यपणे 'कल्पित' या सदराखाली घालतात.) त्यांचे कल्पित' म्हणून वर्णन करण्यात लोकांना ध्वन्यर्थाने असे सुचवावयाचे असते, की त्या व्यक्ती आणि ते प्रसंग 'खोटे' असतात परंतु, हा एक प्रकारचा लोकभ्रम होय. खरी गोष्ट अशी आहे, की ललितलेखकाने वर्णन केलेल्या पात्रात आणि प्रसंगात जी सत्यता असते, ती या जगात प्रत्यक्ष वावरणाऱ्या जिवंत माणसांच्या आणि प्रत्यक्ष प्रसंगाच्या सत्यतेहूनही फार मोठी असते. कादंबरी- नाटकांतून वर्णन केलेली माणसे आपल्याला कधी भेटलेली नसतात हे खरे; परंतु ती आपल्याला केव्हा आणि कोठे भेटतील याचा नियम नाही हेही खरे. शेक्सपियरच्या ऑथेल्लोमधील यागो किंवा कालिदासाच्या मेघदूतांतील विरहव्यथित यक्ष, किंवा डिकन्सच्या 'डेव्हिड कॉपरफील्ड' मधील पोरका डेव्हिड, किंवा हरिभाऊंच्या कादंबरीतील यमुना

असल्या पात्रांना ऐतिहासिक आधार मुळीच नाही. परंतु एवढ्या कारणासाठी ती पात्रे 'खोटी' म्हणता येत नाही. उलट, प्रतिमारूपाने ही सारी मंडळी कुणालाही कोठेही भेटण्याचा संभव असल्यामुळे त्यांस नेहमीपेक्षा अधिक खोल अभिप्रायाने 'सत्य' मानणे भाग आहे. भगवतद्‌गीतेत श्रीकृष्णांनी अर्जुनाचे निमित्त करून जगाला असे आश्वासन दिले, की 'संभवामी युगे युगे'।' या वचनाचा अर्थ मी स्वत: इतकाच मानतो, की ज्या परिस्थितीत श्रीकृष्णांचे चरित्र झाले तशी परिस्थिती जेव्हा जेव्हा उद्‌भवेल तेव्हा तेव्हा श्रीकृष्णासारखे मुत्सद्दी, योद्धे, आणि सत्याचे कैवारी 'संभवतात'. म्हणजे श्रीकृष्ण हा एक नमुना होय, व या नमुन्याच्या व्यक्ती कोणत्याही देशात आणि कोणत्याही कालात आपल्याला आढळण्याचा संभव असतो. कादंबरीनाटकांतील व्यक्तीचे असेच आहे. त्या 'कल्पित' खऱ्या; पण 'खोट्या' नव्हेत. विविध मानवी विकारांचे आणि स्वभावांचे ते शाश्वत नमुने म्हटले पाहिजेत. त्यांच्याच प्रतिमांनी ही प्रत्यक्ष चित्रविचित्र दुनिया गजबजलेली आहे. एखादा कादंबरीकार प्रस्तावेनदाखल वाचकाला सांगतो, की 'बाबारे, माझ्या कादंबरीतील अमुक पात्र म्हणजे तुझ्या ओळखीचे अमुक माणूस समजू नकोस हो !' हे सांगण्याचा उघडच उद्देश असा, की कोणत्याही कादंबरीतील अगर नाटकातील कोणत्याही पात्राचे चित्र अमुक एका विवक्षित जिवंत माणसाच्या प्रत्यक्ष आयुष्याच्या अरूंद चौकटीत बसवावयाचे नसते. अनाद्यनंत मानवी संसार हीच त्या चित्राला साजणारी खरी चौकट होय. ललितकृतीतील नायक अगर खलपुरूष लेखकाने कल्पनेने निर्माण केलेले खरे, परंतु त्यांच्या नमुन्याची माणसे आपल्याला केव्हाही आणि कोठेही भेटण्याचा संभव असतो. आणि या दृष्टीने त्यांना 'सत्य'च म्हटले पाहिजे. सारांश, 'ऐतहासिक सत्य' आणि 'तात्त्विक सत्य' या दोन गोष्टी भिन्न आहेत. ऐतिहासिक सत्याहून तात्त्विक सत्य अधिक शाश्वत आहे. त्याला स्थलकालांच्या मर्यादा नाहीत. ललित वाङ्मयांतील कल्पित पात्रांच्या आणि प्रसंगांच्या ठिकाणी ऐतिहासिक सत्य नसते, पण तात्त्विक सत्य असते; म्हणूनच ललितलेखकाने केलेली त्यांची वर्णने वाचून आपापल्या विविध सुखदुःखाच्या अनुभवाची पुनरावृत्ती करून घेण्याचा मोह आपणाला आवरता येत नाही.

वरच्या वाक्यातील 'पुनरावृत्ती' या शब्दाकडे वाचकांनी लक्ष द्यावे. कारण असे, की ललित वाङ्मयाच्या इतर अंगांविषयी लेखकांत, पंडितांत आणि टीकाकारांत कितीही मतभेद झाले, तरी या 'पुनरावृत्ती' च्या प्रकाराविषयी मतभेद संभवत नाही असे मला तरी निदान वाटते. कादंबरीतील अगर नाटकांतील व्यक्तीचे व्यवहार आणि प्रसंग वाचताना अगर पाहताना आपल्याला आपल्या स्वतःच्या कोणत्या तरी अनुभवाचा पुन:प्रत्यात्य येतो, व या पुन:प्रत्ययात जो एक अवर्णनीय आनंद आहे, त्या आनंदासाठी ललितवाङ्मयाकडे आपण पुनः पुन्हा धाव घेतो. 'आनंद' या शब्दाचा विपर्यस्त अर्थ वाचकांनी करू नये. ललितवाङ्मय हे मुख्यतः आनंदासाठी आहे या माझ्या प्रतिपादनाकडे बोट दाखवून पुष्कळदा असे म्हणण्यात येते, की 'पहा, फडक्यांना मौजेखेरीज ललितवाङ्मयाचे काही कार्य असते याची कल्पनाच नाही !' अशा विपर्यासाला वेळोवेळी उत्तर ते काय द्यावयाचे ? तो करणाऱ्यांनाच तो शोभतो ! मात्र, शांत विचार करणाऱ्या वाचकांसाठी येथे येवढे सांगतो,की 'आनंद' म्हणजे 'चैन' नव्हे ! 'खा,प्या आणि मजा करा !' हे सांगण्यापलीकडे ललितवाङ्मयाचे काही ध्येय नसावे असे कोण म्हणेल ? आणि येवढेच सांगावयाचे असेल, तर त्याला कलावंताची लेखणी तरी कशाला शिणायला पाहिजे ? हे सांगायला कलाकुसरीची काही एक गरज नाही. घिसाडयाच्या राकटपणाने टीकालेख बडवणारे पंडितसुद्धा एवढा संदेश सांगू शकतील की ! सारांश, सामान्यपणे 'चैन' किंवा 'मजा' हे शब्द ज्या अभिप्रायाने वापरले जातात, त्यापेक्षा 'आनंद' या शब्दातील अभिप्राय फार भिन्न आहे. खाऊन पिऊन, चैन करून वाटणारी 'मजा' आणि ललितवाङ्मयाच्या वाचनाने मिळणारा 'आनंद' या दोहोत कोठल्याही तऱ्हेची तुलनाच होणे शक्य नाही. या आनंदाच्या व्याख्या अनेकांनी अनेक प्रकारे केल्या आहेत. म्हणून ती करण्याच्या खटाटोपात न पडता मी एवढेच म्हणतो, की मनुष्यमात्राच्या ठिकाणी ज्याप्रमाणे विवेक आहे, विकार आहेत, सौंदर्याची आवड आहे, निर्मितीची हौस आहे, त्याचप्रमाणे सुखदुःखे संसारात वाट्याला आली त्यांचा पुन्हा एकवार अनुभव घेण्याची विलक्षण इच्छाही आहे. जी स्थळे एकदा पाहिली, ती कालांतराने पुन्हा पहावीशी माणसाला वाटतात; ज्या व्यक्ती एकदा भेटल्या त्या पुन्हा भेटाव्याशा वाटतात; जे प्रसंग एकदा घडले ते पुन्हा घडावेसे वाटतात ! ही हवीशी वाटणारी पुनरावृत्ती प्रत्यक्ष संसारांत एखादे वेळी घडतेही, पण ती फार क्वचित्. इतिहासाची पुनरावृत्ती घडत असते असे म्हणतात. परंतु हे फार मर्यादित अर्थाने खरे आहे. एकंदर मानवजातीचा स्थूल इतिहास त्याच त्या चौकटीतून जात असतो, इतकाच त्याचा अर्थ. व्यक्तीच्या बाबतीत जीवनप्रसंगांची पुनरावृत्ती घडणे फार विरळा. मात्र, ललित वाङ्मयात या पुनरावृत्तीचा अनुभव आपल्याला अप्रत्यक्षतः मिळतो; आणि तो मिळाला, की आपल्याला एक अवर्णनीय 'आनंद' होतो. ललित वाङ्मयाची खरी थोरवी हीच आहे.

अक्षर वाङ्मयाचा गुणाविशेष.

म्हणूनच मी वर म्हटले, की वाङ्मयाच्या इतर आनुषंगिक गोष्टींबद्दल मतभेद होण्याचा संभव असला, तरी वर वर्णन केला त्या प्रकारचा 'आनंद' देण्याची त्याची जी शक्ती तिच्याबद्दल दुमत होणे शक्य नाही. आणि ही गोष्ट लक्षात घेता जे ललित वाङ्मय अमर आणि अक्षर ठरते, ते कोणत्या गुणविशेषांमुळे तसे ठरते याचा उलगडा सहज होतो. उपरिनिर्दिष्ट आनंद देणे हे जर ललित वाङ्मयकृतीचे प्रधान कार्य होय, तर अर्थातच ज्या ललितवाङ्मयकृतींपासून मिळणारा आनंद कधी संपत नाही त्या अक्षरत्व पावतात. पूर्वी कोठे तरी लिहिताना सामान्यतः सर्व प्रकारच्या कलेविषयी मी असे म्हटले होते, की या प्रत्यक्ष सृष्टीत सौंदर्य नाही. असे नव्हे, पण त्या सौंदर्यावर स्थलकालांची बंधने आहेत; आणि कलेची महती ही, की तिच्या सृष्टीतील सौंदर्याला स्थलकालांची बंधने नसतात. जे अस्सल ललित वाङ्मय असते त्यांची गोष्ट अशीच

असते. त्यापासून मिळणाऱ्या आनंदाला स्थलकालांच्या सीमा लागू शकत नाहीत. हेच विधान उलट फिरवून असे म्हणावयास हरकत नाही, की ज्यापासून मिळणारा आनंद अमुक एका ठिकाणच्या अमुक एका काळातल्या, अगर अमुक एका प्रकारच्या मनोवृत्तीच्या वाचकालाच काय तो मिळण्यासारखा असतो ते ललित वाङ्मय त्या त्या काळापुरते प्रभावी आणि उपकारक ठरले, तरी ते अमर ठरू शकत नाही; आणि जे ललित वाङ्मय अमर आणि अक्षर ठरते, ते तसे ठरते याचे खरे कारण हे, की त्यापासून मिळणारा आनंद बहुतांशी स्थलकालनिरपेक्ष असतो.

तिसऱ्या भागाचे नीट आकलन झाल्यावर कोणते मुद्दे सुचतात ?

१) मानवी अंतःकरणाचे अविनाशी धर्म आहेत.

२) ललितकथेतील व्यक्ती 'कल्पित' खऱ्या पण त्या 'खोट्या' नव्हेत. विविध मानवी विकारांचे शाश्वत नमुने म्हणजे या व्यक्ती.

३) ललित वाङ्मय हे मुख्यतः आनंदासाठी आहे.

४) ललितवाङ्मयात जीवनप्रसंगाची पुनरावृत्ती घडते आणि या पुनरावृत्तीचा अनुभव मिळाल्यामुळे आनंद होतो.

५) हा आनंद बहुतांशी स्थलकालनिरपेक्ष असतो.

## १.३.६ ललितकला आणि मनोधर्म.

अमर ठरलेल्या ललितकृतींचे रहस्य काय ते येथे फडके सांगत आहेत. या कृती शाश्वत आणि सर्वमान्य मनोधर्माच्या आणि सुखदुःखाच्या अधिष्ठानावर उभ्या असतात. देशपरत्वे व कालपरत्वे या सुखदुःखाचे स्वरूप वेगळे दिसले तरी तरी त्यांचे मूलस्वरूप एकच असते, अविनाशी असते. सहृदय मनुष्यात म्हणजे रसिक सदभिरुचिसंपन्न वाचकास त्या आनंद देणारच मग तो कोणीही असो, कोठलाही असो

## १.३.७ ऐतिहासिक 'सत्य' आणि साहित्यातील 'सत्य'.

'ऐतिहासिक सत्य' आणि 'साहित्यातील सत्य' यांमधील भेद येथे दाखविलेला आहे. इतिहासातील व्यक्ती, प्रसंग, घटना ह्या खऱ्या असतातः म्हणजे त्या विशिष्ट काली विशिष्ट स्थली, विशिष्ट व्यक्तींच्या मुळे घडलेल्या असतात. ते पुराव्याने सिद्ध करता येते.

साहित्यकृतीतील-म्हणजे कथा, कादंबरी नाटकादी, साहित्यकृतीतील पात्रे, प्रसंग, स्थल, कालही प्रत्यक्षातली, वास्तवातली नसतात. ती कल्पित असतात. पण 'कल्पित' म्हणजे 'खोटे' असे नव्हे. ही पात्रे जगात आपणांस प्रत्यक्ष भेटणार नाहीत, पण ह्या पात्रांसारखा स्वभाव असलेली, कृती,वर्तन असलेली माणसे आपणांस भेटू शकतात. प्रतिमारूपाने ही पात्रे आपणांस केव्हाही आणि कोठेही आढळू शकतात. ही पात्रे विविध मानवी विकारांचे व स्वभावांचे शाश्वत नमुने असतात. ही प्रतिमारूप पात्रे वास्तवातल्या व्यक्तीच्या मर्यादित आयुष्याच्या चौकटीत सामावू शकत नाहीत. ती त्या चौकटीहून मोठी, खोल, असतात. 'साहित्यातील सत्य' म्हणजे प्रत्यक्ष वास्तव किंवा ऐतिहासिक सत्य नसून ते शाश्वत रूपाचे, म्हणजे जीवनाचे 'तात्त्विक सत्य' असते, म्हणूनच हे सत्य वास्तवाहून मोठे व अधिक सत्य असते.

फडके यांनी अक्षरवाङ्मयातील अशा अमर नमुनापात्रांची उदाहरणे दिली आहेत. शेक्सपियरचा ऑथेल्लो, पोरका डेव्हिड, हरिभाऊंची यमुना, कालिदासाचा यक्ष, फार काय 'श्रीमद् भगवत् गीता' सांगणारे श्रीकृष्ण ही ती अमर शाश्वत पात्रे; सत्याहून अधिक सत्य असलेली ! अनादि-अनंत मानवी संसाराच्या विराट चौकटीतली ही शाश्वत जिवंत पात्रेच होत ! साहित्याची अमरता आणि श्रेष्ठता या पात्रांच्या अमरतेवर आणि श्रेष्ठतेवर अवलंबून असते.

## १.३.८ ललित वाङ्मयाच्या वाचनाने आनंद का होतो ?

साहित्य वाचनाने आनंद होतो, तो का याचा विचार येथे फडके यांनी मांडलेला आहे. हा आनंद 'पुनःप्रत्यया' मुळे होतो, असे त्यांचे मत आहे. पुनःप्रत्यय म्हणजे अनुभवाची पुनरावृत्ती. साहित्यामध्ये आपणांस जीवनाच्या अनुभवाच्या पुनरावृत्तीचा अप्रत्यक्षपणे आनंद मिळत असतो. आपल्या संसारात जी सुखदुःखे आपल्या वाट्याला आली त्यांचा पुन्हा एकवार अनुभव घेण्याची विलक्षण इच्छा प्रत्येक माणसाला असते. ही पूर्तता साहित्यवाचनाने होते, म्हणून तो आनंदित होतो.

'आनंद' म्हणजे 'चैन' किंवा 'मजा' नव्हे, हे फडके यांनी सुस्पष्ट केले आहे. या दोन्हीत तुलना करणे शक्य नाही, इतका साहित्यानंद हा वेगळ्या जातीचा व उच्च कोटीचा आहे.

साहित्यापासून होणारा आनंद हा स्थलकालनिरपेक्ष असतो, असे सांगून फडके अक्षर वाङ्मयाची एक व्याख्या करतात , ती अशी - "जे स्थलकालनिरपेक्ष असा आनंद देते ते अक्षर वाङ्मय होय !"

स्वयं अध्ययनसाठी प्रश्न



(झ) पुढील वाक्ये पूर्ण करा:-

(१) मानवी अंतःकरणाचे अविनाशी धर्म आहेत. उदा. राग, द्वेष. ..............

(२) मानवी सुखदु:खांचा बाह्य आकार जरी स्थलकालपरत्वे बदलला तरी त्यांचे मूलस्वरूप..........

(३) अमर ठरलेल्या ललितकृती यांचे अधिष्ठान................

(ञ) रिकाम्या जागा भरा

(१) साहित्यातील प्रसंग व पात्रे कल्पित असली तरी ती..........नसतात; साहित्यातील जीवनचित्रण हे अधिक.........असते; अधिक.........असते.

(२) साहित्यातील पात्रे कल्पित खरी, पण ती मानवी........आणि शाश्वत.....म्हटली पाहिजेत.

(३) 'ऐतिहासिक सत्य' आणि 'तात्त्विकबद्ध सत्य' या दोन गोष्टी.........आहेत.

(४) पुनःप्रत्ययाचा आनंद.........असतो. ('अवीट', अवर्णनीय', सर्वश्रेष्ठ'- यांपैकी योग्य तो शब्द रिकाम्या जागी भरा.)

(ट) पुनःप्रत्ययाचा आनंद घ्यावा ही माणसाची एक स्वभाविक इच्छा असते. अशा आणखी कोणत्या स्वाभाविक इच्छांची नोंद फडके यांनी येथे केली आहे ?

## १.३.९ चौथ्या भागाचे वाचन, मनन आणि मुद्दे.

वरच्या विधानात 'बहुतांशी' हा शब्द मी मुद्दाम घातला आहे. तो अशासाठी, की वाङ्मयापासून कोणत्याही वाचकाला जो आनंद होतो, त्या आनंदाचा काही भाग त्या वाचकाच्या अंतःकरणाच्या विशिष्ट ठेवणीमुळे उत्पन्न झालेला असतो. कादंबरीतील एखादा प्रसंग वाचताना अगर नाटकातील एखादा प्रसंग पाहताना वाचकाला किंवा प्रेक्षकाला किती आनंद होईल हे लेखकाने ज्या लालित्याने तो प्रसंग रंगविला असेल त्यावर तर अवलंबून राहीलच, परंतु जो वाचक अगर प्रेक्षक तो प्रसंग वाचणार अगर पाहणार त्याची स्वतःची अनुभवसिध्दी किती आहे यावरही तो आनंद अंशतः अवलंबून असणार हे विसरून चालणार नाही. वांझेला प्रसूतिवेदना कितीही वर्णन करून सांगितल्या तरी समजणे शक्य नाही, हे काहीसे ग्राम्य सुभाषित ललित वाङ्मयापासून उद्भवणाऱ्या आनंदाच्या मीमांसेत लागू करावयास हरकत नाही. शाकुंतल नाटकातील एका प्रवेशात शकुंतलेच्या तोंडाभोवती गुंजारव करणाऱ्या भ्रमराला उद्देशून दुष्यंत राजा स्वगत म्हणतो, 'भ्रमरा, तूंच खरा रसिक. कारण, सौंदर्योपभोग तूं साधलास ! अन् आम्ही मात्र कार्याकार्याचे निर्णय करीत बसलो आहोत तसेच !' दुष्यंताच्या तोंडचे हे वाक्य भाषेच्या आणि कल्पनेच्या दृष्टीने सुंदर आहे यात प्रश्नच नाहीं परंतु त्या वाक्यातील आनंद अगदी पूर्णांशाने कोणाला बरे होईल ? अर्थात् जो पुरुष कुणा तरी स्त्रीवर कधी तरी अनुरक्त झाला असेल, आणि युक्तायुक्ततेचे विचार करता ज्याने प्रेमपूर्तीची संधी गमावली असेल त्यालाच ! किंवा, शाकुंतल नाटकात ज्या प्रवेशात कण्वमुनी शकुंतलेला दुष्यंताकडे पाठविताना निरोप देतात त्या प्रवेशाचा आनंद पूर्णांशाने कुणाला बरे घेता येईल ? वाटेल त्याला ? नाही.

तर ज्यांनी प्रेमातिशयाने पालनपोषन केलेल्या पोटच्या मुलीला दुसऱ्याच्या हाती कायमची देताना होणारी अंतःकरणाची कालवाकालव अनुभविली असेल, आणि डोळ्यांत गर्दी करणारी आंसवे प्रयत्नाने परतविता परतविता ज्यांची बोटे ओली झाली असतील त्यांनाच शाकुंतल नाटकातील त्या करूणरसाने ओथंबलेल्या प्रवेशांतील आनंद पूर्णत्वाने घेता येईल. 'Count of Monte Cristo' या चित्रपटातील ज्या प्रवेशांत कुटिल राजनीतीला बळी पडून वर्षानुवर्षे बंदीत अडकलेल्या नायकाची मुक्ततेसाठी चाललेली धडपड दाखविली आहे त्या प्रवेशाचे उदाहरण घेऊ. दिग्दर्शन आणि अभिनय या दोनही दृष्टीने त्याचा आनंद कुणाही प्रेक्षकाला होईल हे तर खरेच; पण देशभक्त सावरकरासारख्या प्रेक्षकाच्या अंगावर आनंदाचे जे रोमांच उभे राहतील ते काही वेगळेच ! नाटककादंबऱ्यांतील कित्येक प्रसंगांचे रोमांचकारित्व प्रत्येक वाचकाच्या अगर प्रेक्षकाच्या बाबतीत सहज शक्य असते असे नव्हे. रोमांचाचा अनुभव निर्माण करण्यासाठी लेखकाला जशी तपश्चर्या करावी लागते, तशीच तो अनुभव घेण्यासाठी वाचकाची अगर प्रेक्षकाचीही तपश्चर्या झालेली असावी लागते. या दृष्टीने विचार करता ललित वाङ्मयापासून होणारा आनंद अंशतः 'व्यक्तिनिष्ठ' असतो असे आपल्याला म्हटलेच पाहिजे. इतर कोणत्याही कलेप्रमाणेच ललित वाङ्मय म्हणजे कलावंत आणि रसिक या दोघांच्या अंतःकरणामध्ये घडणारा अेक प्रकारचा 'संवाद' आहे. ध्वनिशास्त्रज्ञ असे सांगतात, की दोन वीणावाद्ये जर अेकाच सुरात उत्तम तऱ्हेने जुळलेली असली तर अेका वीणेच्या तारा छेडताच दुसऱ्या वीणेच्या तारा आपोआप स्फुरण पावून ध्वनी करू लागतात. लेखक आणि वाचक यांचे अमेच आहे. वाचकाच्या अंत:करणाची तयारी लेखकाच्या अंत:करणाच्या तयारीइतकी असेल, तरच वाचकाला लेखकांचे मर्म पूर्णांशाने समजून आनंदही पूर्णत्वाने होईल. याच अभिप्रायाने बहुधा भवभूतीने आपल्या सुप्रसिद्ध दर्पोक्तीत 'समानधर्मा' हा शब्द वापरला असावा. ललित वाङ्मयापासून उत्पन्न होणाऱ्या आनंदात अर्धे कर्तृत लेखकाचे तर अर्धे कर्तृत वाचकाचे हेच खरे. सूर्यकिरणे ज्या ज्या पदार्थांवर पडतील

तो तो पदार्थ तप्त व्हावा हा त्या किरणांचा धर्म तर खराच; परंतु योग्य त्या स्फटिकातून जर ती किरणे पडली तरच त्यांचे दहनशीलत्व पूर्णत्वाने प्रकट होते. ललित वाङ्मयाच्या आनंदाची हीच गोष्ट आहे.

सगळे खरे असले, तरी स्थूल दृष्टीने या आनंदाचा बराच मोठा भाग स्वयंसिद्ध आणि व्यक्तिनिरपेक्ष असतो हे विसरून चालावयाचे नाही. कारण असे, की व्यक्तिव्यक्तीची अनुभवसिध्दी जरी भिन्न असली, तरी मूलभूत म्हणून ज्या काही मानवी भावना आहेत त्या सर्व व्यक्तींच्या ठिकाणी सदैव असतात. त्या सामान्य आणि शाश्वत अशा आहेत. व्यक्तिव्यक्तींना संसारांतील सुखदु:खांचा अनुभव वेगवेगळया तऱ्हेने आणि तीव्रतेने येतो खरा; पण या सगळयाच्या मुळाशी जे मनोविकार असतात ते सगळया मानवी व्यक्तीच्या ठिकाणी असतात. ते विकार व्यक्तीचे नसून मानवजातीचे असतात.
गरिबांपासून तो श्रीमंतापर्यंत सगळयाच मनुष्यांना मातेच्या वात्सल्याचा अनुभव आलेला असतो, व मातृप्रेमाची भावना सर्वांच्याच ठिकाणी असते. प्रबळाप्रमाणेच दुर्बळालाही महत्त्वाकांक्षा म्हणून काही तरी असते व सुखस्वप्ने पडत असतात. कुबेरकन्येप्रमाणेच भिकाऱ्याच्या मुलीलाही प्रणयविकार कळतो. सुष्ट, दुष्ट दोघांनाही भय वाटते. आशानिराशा, काम क्रोध, लोभ इत्यादी भावना सर्व मनुष्यांच्याच अंतःकरणांत खळबळत असतात. या मानवी भावनांच्या आडव्या उभ्या धाग्यांनीच प्रत्येक व्यक्तीच्या संसाराचे वस्त्र विणले जात आहे. त्या वस्त्राची लांबीरुंदी, जाडपणा अगर तलमपण; आणि आकार भिन्न भिन्न बनतात. परंतु, त्यातले आडवे उभे धागे एकच असतात. या धाग्यांची गुंतागुंत आणि उकल करून दाखविणे हेच प्रत्येक ललितकथेचे नियोजित कार्य आहे. ती गुंतागुंत आणि उकल पाहिली की वाचकाला अगर प्रेक्षकाला आनंद होतो. ज्या ललितकथेतील हा आनंद लवकरच जुना होतो, ती कालांतराने लोकांच्या स्मरणातून नाहीशी होते; आणि उलट, ज्या ललितकथेतील हा आनंद कधी विटत नाही तिचे वाचकांना कधी विस्मरण होत नाही. ती अक्षर वाङ्मयांत समाविष्ट होते.
म्हणजे अक्षर वाङ्मयाचा गुणविशेष कोणता या प्रश्नाचे उत्तर त्याच्या ठिकाणची 'आनंद' देण्याची अविच्छिन्न शक्ती असेच दिले पाहिजे. मानवजातीच्या ठिकाणी ज्या शाश्वत आणि अविनाशी भावना आहेत, त्यांच्या तारा हळुवार हाताने ज्या कथालेखकाने छेडलेल्या असतात त्याचे लेखन कोठल्याही काळी रंजक होते. कोणी म्हणेल, की मूलभूत मानवी भावना हलविण्याचा प्रयत्न प्रत्येक ललितलेखक करीत असतो; मग सगळयाच ललितकृती अक्षर का ठरत नाहीत ? ही शंका साहजिक आहे. पण वर तंतुवाद्याची उपमा दिली, तिच्या साहाय्याने या शंकेचे निरसन सहज करता येण्यासारखे आहे. सुरांत मिळविलेल्या सतारीच्या ताराप्रमाणे मूलभूत मानवी भावना सदा सुसज्ज आहेत हे खरे; पण, त्यावरून हात फिरवणे हे वाटते तसे सोपे काम नाही. तंतुवाद्य सज्ज असले तरी ते छेडण्यात कसब म्हणून काही तरी आहेच ना ? जो असामान्य लेखक असतो तो शाश्वत मानवी भावनांचा अशा काही जादूगिरीने खेळ करतो की त्याच्या लेखनातील आनंद मानवजातीच्या पिढयान्पिढयांनी घेतला तरी संपत नाही. आनंद देण्याचे अविनाशी सामर्थ्य हीच अक्षर वाङ्मयाची खरी कसोटी होय.

उताऱ्याच्या चौथ्या भागाचे आकलन झाल्यावर कोणते मुद्दे लक्षात येतात ?

(१) ललित वाङ्मयापासून वाचकाला मिळणारा आनंद त्याची अनुभवसिद्धी किती यावर अवलंबून आहे.
(२) या आनंदप्रक्रियेत वाचक आणि लेखक यांच्या अंतःकरणाची तयारी सारखीच हवी.
(३) मानवी भावनांची गुंतागुंत आणि उकल करून दाखवणे हेच ललितकथेचे कार्य आहे.
(४) आनंद देण्याचे अविनाशी सामर्थ्य हीच अक्षर वाङ्मयाची खरी कसोटी होय.

### १.३.१० अक्षर वाङ्मयाची खरी कसोटी.

ललित साहित्याने होणारा आनंद स्थलकालनिरपेक्ष असतो, असे म्हणताना फडके यांनी 'बहुतांशी' असा शब्द घातलेला आहे, तो का याचे स्पष्टीकरण या भागात आले आहे. सर्वच वाचकांना असा आनंद होतो किंवा घेता येतो असे नाही. वाचक हाही अनुभवाने समृद्ध असावा लागतो, तरच तो 'पुनःप्रत्यया'चा आनंद लुटू शकतो. यासाठी फडके यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. कालिदासाच्या 'शाकुंतला' तील भ्रमरप्रसंगाचे आणि शकुंतलेच्या आठवणीचे. ह्या प्रसंगचित्रणाचा पूर्णत्वाने आनंद घेण्यारी अधिकारी व्यक्ती असा पूर्वानुभव घेतलेली असावी लागते, असे फडके यांचे म्हणणे आहे. 'पूर्णत्वाने' हा शब्द येथे महत्त्वाचा आहे; तसे नसले तर तो आनंद 'अंशतः व्यक्तिनिष्ठ ? असतो असे म्हणावे लागेल
ललित वाङ्मयाचा आनंद घेण्यासाठी वाचकही समानधर्मा असावा लागतो; म्हणजे लेखकाच्या वाङ्मयीन व्यक्तित्त्वांशी त्याची वाङ्मयीन अभिरुची ही समान असणे आवश्यक असते. फडके यातून रसास्वादासंबंधी एक तत्त्व मांडतात- 'इतर ललितकलांप्रमाणेच ललित वाङ्मय म्हणजे कलावंत आणि रसिक या दोघांच्या अंतःकरणामध्ये घडणारा एक प्रकारचा 'संवाद' असतो ! यासाठी त्यांनी एकाच सुरात जुळवून ठेवलेल्या दोन वीणावाद्यांचा मार्मिक दृष्टान्त दिला आहे.

ललित वाङ्मयापासून होणाऱ्या आनंदात लेखकाइतकेच वाचकाचे, म्हणजे रसिकाचेही कर्तृत्व असते सूर्यकिरणाइतकेच ती किरणे एकत्रित करणाऱ्या बहिर्गोल भिंगाचे महत्त्व असते-तरच सूर्यकिरणातील दाहकशक्ती प्रकट होते, असा यासाठी फडके यांनी पुन्हा एक दाखला दिला आहे.

ललित वाङ्मयापासून होणारा आनंद हा अंशतः वाचकसापेक्ष असतो, तो बराचसा नायकनिरपेक्ष असतो, हे येथे फडके पुनः सांगतात. हा आनंद 'स्वयंसिद्ध' असतो यावर ते भर देतात, कारण साहित्यातील अनुभवसृष्टी ही व्यक्तीच्या विकारांची नसून ती सर्व मानवजातीची असते, हे पुन्हा ते सिद्धान्तरूपाने येथे मांडतात. मानवांच्या मूलभावना आणि विकार हे सर्वांच्या ठायी समान असतात. हे 'कुबेरकन्ये प्रमाणे भिकाऱ्याच्या मुलीलाही प्रणयविकार कळतो' अशा दृष्टान्ताने पटवून देतात. मानवी संसाराचे वस्त्र या मूलभूत भावनांच्या उभ्या-आडव्या धाग्यांनी विणले जाते, असे रूपक ते उपयोजतात. लेखक या मोठ्या कौशल्याने या धाग्यांची गुंतागुंत आणि उकल करून दाखवतो. ह्या कलाकौशल्याने रसिक वाचकाला आनंद होतो.

अक्षर वाङ्मयाचा गुणाविशेष.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न :

(ठ) ललितवाङ्मयापासून होणारा पुनःप्रत्ययाचा आनंद पूर्णत्वाने केव्हा घेता येतो, हे पटविण्यासाठी फडके यांनी कोणती उदाहरणे दिली आहेत ?

(ड) कलावंत आणि रसिक यांच्यातील नाते स्पष्ट करण्यासाठी फडके यांनी कोणते दृष्टान्त दिले आहेत ?

(ढ) समानधर्मा म्हणजे काय ?

(ण) अक्षर वाङ्मयाचा कोणता गुणविशेष निर्णयरूपाने सांगितला आहे ?

## १.४ नमुना उत्तरे.

(क) (१) बहुमानाची (२) अजरामर, अक्षर

(ख) (१) भवभूती (२) आज चमकले, उद्या मालवले.

(ग) (१) निर्दोष, अबालवृद्ध, लोलुपता, प्रत्यय.

(२) कालिदास, भवभूती, भास

अंतःकरणाच्या

विराजत

(घ) (१) नावडतीचे मीठ अळणी

'Kill this dog. He is a reviewer!"

(ङ) 'गॉएटे चे उद्गार समर्थनीय असोत वा नसोत' असे फडके यांनी म्हटले आहे. त्या उद्गाराचा भावार्थ त्यांना मान्य आहे.

(च) (१) कालिदास, भवभूती, रवीन्द्रनाथ टागोर इ......

(२) क्रांत्या; फेरबदल

स्थित्यंतरे, पालटते. अक्षर वाङ्मयावरील प्रेमात बदल होत नाही.

(छ) (१) नीतीनियम, सामाजिक जीवनाचा दृष्टिकोण, राजकीय जीवन.....

(२) शेक्सपियरची नाटके अलौकिक आहेत, अक्षर वाङ्मय या बहुमानाने त्यांचा गौरव केला पाहिजे ही बाब.

(ज) प्रसंगोपात्त, स्थलपरत्वे, गढूळ, कमलपत्राप्रमाणे, अक्षर वाङ्मय.......

(झ) (१) वात्सल्य, प्रणय, असूया, लोभ, अहंकार इत्यादी.

(२) शाश्वत आणि अचल असते.

(३) शाश्वत आणि सर्वमान्य मनोधर्म आणि सुखदुःखे

(ञ) (१) खोटी, सत्य, खोल.

(२) विकारांचे, स्वभावांचे, नमुने

(३) भिन्न.

(४) सर्वश्रेष्ठ.

(ट) (१) सौंदर्याची आवड, निर्मितीची हौस.

(ठ) 'शाकुंतला'तील भ्रमर प्रसंग, शकुंतलेची पाठवणी आणि Count of monte Cristo.

(ड) एका सुरात जुळविलेली दोन वीणावाद्ये; सूर्य किरण आणि स्फटिक....

(ढ) समान मनोधर्म असलेला.

(ण) अविच्छिन्न आनंद देण्याची शक्ती ज्या वाङ्मयात असते ते वाङ्मय अक्षर होय, हा तो अंतिम निर्णय. सर्व लेखक मूल भावनांचे चित्रण करीत असले तरी ते चित्रण, ती गुंफण जमणे हे असामान्य प्रतिभावंत कलावंत-लेखकांचेच काम आहे.

## १.५ विविध दष्टिकोणांतून अध्ययन.

### १.५.१ ना.सी. फडके यांची प्रतिपादन-पद्धती व शैली.

ललितवाङ्मय-लेखन असो की निबंधलेखन असो, ना.सी.फडके यांचे लेखन अगदी तंत्रशुध्द असते. प्रस्तुत निबंधाची रचना अशीच तंत्रशुध्द आहे. फडके यांनी येथे अक्षर वाङ्मयाविषयाचा मूलभूत महत्त्वाचा सिद्धान्त मांडला आहे. सर्वांगांनी विचार करून त्यांनी आपला हा सिद्धान्त सिद्ध करून दाखविला आहे.

अविच्छिन्न आनंद देण्याची शक्ती हा अक्षर वाङ्मयाचा गुणविशेष हा त्यांचा सिद्धान्त किंवा मूलभूत विचार. या विचाराचे त्यांनी वारा घटक केले. त्यांना आपण मुद्दे म्हणू. ह्या मुद्यांमध्ये एक तर्कसंगत क्रम लावला आणि त्या क्रमाने हे मुद्दे एकातून एक निघतील असे मांडत सुसूत्र रीतीने आपला सिद्धांत स्पष्ट केला. निबंध लेखनाला ही वैचारिक तर्कसंगती आवश्यक असते. (हे मुद्दे व त्यांची सुसूत्र रचना तुम्ही 'सारांश' या भागात पाहा.)

प्रत्येक मुद्दा आधी स्वतंत्र रीतीने मांडावा लागतो. व स्पष्ट करावा लागतो. (त्या साठी परिच्छेद रचना करावी लागते फडके यांची परिच्छेद रचना ही अगदी तंत्रशुध्द असते.

प्रथम विधान येते - 'प्रत्येक राष्ट्राने आपल्या मातृभाषेतील काही ललितकृतींचे मोठया प्रेमाने रक्षण केलेले असते.

स्पष्टीकरण - या विधानाचे स्पष्टीकरण पुढील ४-५ वाक्यांत येते. 'त्या राष्ट्रावर आलेल्या विविध आपत्तीतून...........राष्ट्रातील स्त्री-पुरूष त्यांच्याकडे पाहू लागतात.

उदाहरण - शेक्सपियरची नाटके व ईंग्लिश लोक.

प्रमाण - आपले मत कसे योग्य आहे यासाठी इतर काही मान्यवरांची पूरक, पोषक मते उद्धृत करणे, यास 'प्रमाण' देणे असे म्हणतात. येथे कार्लाईलचे वचन आलेले आहे. उदाहरण आणि प्रमाण असे दुहेरी काम येथे या वचनाने केलेले आहे.

निर्णयः - प्रारंभी केलेले विधान अशा तऱ्हेने निर्णयरूपाने पुन्हा मांडणे. येथे 'प्रत्येक राष्ट्राचे असे लाडके शेक्सपियर असतात'. हा निर्णय अशा रीतीने प्रत्येक मुद्दा एकेका परिच्छेदात, विधान, स्पष्टीकरण, उदाहरण, प्रमाण आणि निर्णय अशा क्रमाने फडके येथे सिद्ध करीत गेले आहेत. असे सिद्ध केलेले मुद्दे एका तार्किक क्रमाने एकसंघपणे मांडून फडके यांनी आपला हा लेख पूर्ण केला आहे.

ना.सी.फडके आपला विषय इतका स्पष्ट करतात आणि उदाहरणे, प्रमाणे देऊन तो पटवतात की त्यासाठी पुन्हा वेगळ्या स्पष्टीकरणाची आवश्यकता नसते. फडके हे 'काय सांगायचे' याला महत्त्व देत नाहीत, असे नाही. पण ते 'कसे सांगायचे' याला अधिक महत्त्व देतात.

आपण प्रत्येक विधान तर पूर्ण विचारान्ती करीत आहोतच पण त्यातील प्रत्येक शब्दसुध्दा तितकाच पूर्ण विचारान्ती योजीत आहोत, ह्याची जाणीव फडके आपणांस करून देतात.

विचार स्पष्टीकरणासाठी फडके अलंकार, म्हणी, सुभाषिते आणि पूर्वसुरींची वचने उद्धृत करतात; अनेक पूर्वसंदर्भ देतात. 'अध्ययन' या भागामध्ये याचा आपण विचार केलेला आहे. एक गोष्ट येथे ध्यानात घ्यावी की यांचा वापर ते इतक्या सहजपणे आणि सफाईदारपणे करतात की तो मूळ प्रतिपादनाशी एक जीव होऊन जाते. त्यामुळे प्रतिपादनाचा ओघ खंडित न होता, उलट तो अधिक प्रवाही आणि गतिमान होतो. यासाठी ते अवतरणाच्या आणि मूळ लेखकाच्या, त्याच्या ग्रंथाच्या नावांचा तपशीलही फारसा देत नाहीत. आशयावर ते आपले लक्ष केंद्रित करतात. यामुळे लेखन जड बोजड होत नाही. एक लयबध्द प्रवाही वक्तृत्वाचे रूप त्याला येते.

### १.५.२ फडके यांची शब्दकळा- भाषाभ्यास.

फडके संस्कृत शब्दांचा विपुलतेने वापर करतात, पण हे शब्द क्लिष्ट नसतात; ललित-मधुर आणि नाद-सुंदर असे ते असतात.उदा. मुरलीरव, वनमाली, प्रेमपूर्ती, लोलुपता , कुबेरकन्या इ. या शब्दांमध्ये अंतर्गत अनुप्रास असतो; एक लय असते.

फडके काही नवे शब्द तयार करतात; इंग्रजी शब्दांना नवे सुंदर पर्याय देतात. उदा.Common ground = सामान्य अधिष्ठान.Classical Literature =अक्षरवाङ्मय. (यास ह. ना. आपटे यांनी 'विदग्ध साहित्य' असे संबोधिले आहे.)

फडके जुन्या रूढ शब्दांची चिकित्सा करतात आण त्यातील अर्थशून्यता स्पष्ट करतात. उदा. 'कपोलकल्पित' वरील त्यांचे भाष्य पाहा

फडके जुन्या म्हणीबरोबर नव्या म्हणी तयार करून वापरतात. उदा. (१) नावडतीचे मीठ आळणी.

फडके यांची शब्दघटना अभ्यास करण्यासारखी आहे-

उपसर्गघटित - अजरामर, निरपवाद,

प्रत्ययघटित - रोमांचकारित्व, लोलुपता.

सामासिक - तेजोवलय, युक्तायुक्तता.....इ....

अक्षर वाङ्मयाचा गुणाविशेष.

'गुंतागुंत उकल' - हा शब्दप्रयोग फडके यांनी साहित्यकृतीच्या निर्मिती - तंत्राच्या संदर्भात 'प्रतिभासाधन' या ग्रंथात वापरलेला आहे. हे शब्द व ही परिभाषा त्यांनी स्वतःची बनविली आहे.

### १.५.३ पुनःप्रत्ययाचा सिद्धांत.

ललितवाङ्मयाने होणाऱ्या आनंदाचे स्वरूप 'पुनःप्रत्यया' चे असते असे फडके मानतात व तो आनंद सर्वश्रेष्ठही मानतात. आपणांस पूर्वी न आलेले अनुभव वाङ्मयातून पाहण्यास मिळत नाहीत का ? ह्या नव्या प्रत्ययाचा, नव्या अनुभवाचा आपणांस आनंद होत नाही का ? नित्य नवे काही पाहावे, समजावे अशी आपणांस जिज्ञासा नसते का ? जिज्ञासापूर्तीचा आनंद वाङ्मयाने मिळतो ना ?

ललित वाङ्मयाने होणाऱ्या आनंदाचा शोध अनेक काव्यशास्त्रज्ञांनी घेतला आहे आणि अनेक सिध्दान्त मांडलेले आहेत. फडके यांनी प्रतिपादिलेल्या पुनःप्रत्यय-सिद्धान्ताचा तुम्ही वाचलेल्या साहित्यकृतींच्या आधारे पुनर्विचार करा.

### १.५.४ लेखक परिचय

नारायण सीताराम फडके (१८९४-१९७८) मराठीकादंबरीचे जादूगार. मराठी लघुकथेचे शिल्पकार. कादंबरी, कथा, नाटक लघुनिबंध इत्यादी वाङ्मयप्रकार समृद्ध करण्याचे श्रेय यांना द्यावे लागेल. जादूगार, दौलत, अखेरचे बंड, प्रवासी इ. ७५ कादंबऱ्या प्रसिद्ध. मराठी समीक्षेत 'कलेसाठी कला' या वादाचे पुरस्कर्ते. प्रतिभासाधन, साहित्य आणि, संसार, लघुकथा- तंत्र आणि मंत्र, खाडिलकरांच्या नाट्यकृती इत्यादी त्यांची साहित्यसमीक्षाविषयक पुस्तके.

मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (१९४०) हे संमेलन रत्नागिरी येथे भरले. १९६२ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' देऊन गौरवले. तत्वज्ञ ानाचे नामवंत प्राध्यापक. उत्तम वक्ता आणि लोकप्रिय ललित लेखक असा त्यांचा लौकिक .

### १.५.५ साहित्यातील 'शाश्वता' विषयी प्रा.दि.के. बेडेकर

साहित्यातील 'शाश्वता' संबंधी कलाशास्त्रज्ञ व समीक्षक प्रा.दि.के. बेडेकर यांचा विचार पाहा:-

"प्रत्येक कलाकृतीमध्ये काहीतरी निर्मिती, म्हणजे नवी एकरूपता, साधलेली असते. ती वास्तवात न दिसलेली व न दिसणारी असते. या अर्थाने ती कलेची नवलाई व अपूर्वाई असते व तिलाच कलेचे सामर्थ्य व कार्यही म्हणता येते. वास्तवातील घटकांची, त्यांच्या मर्यादा उल्लंघून, नवी एकजीव मूर्ती बनविणे हेच कलेचे सर्जन होय, आणि हे सर्जन. जितके अपूर्व असते तितकेच शाश्वत स्वरूपाचे असते. तसेच, एकदा रचलेले शाकुंतल किंवा घडविलेली मूर्ती ही जशीच्या तशी चिरकाल राहते. तिच्यातील निर्मितीचे ओज व रसिकाला प्रतीत होणारे सौंदर्य चिरंजीवी असते. पंचमहाभूतांच्या आघाताने कलाकृतीच्या देहाकाराला आवश्यक असणारे दगडासारखे साधन झिजू शकेल, पण तरी त्यामुळे मूळ शिल्पाचे सौंदर्य घटत नाही. आज छिन्नविच्छिन्न झालेल्या व झिजलेल्या घारापुरीच्या शिल्पातून मूळ सौंदर्याचे शाश्वत रूपच आपण पाहत नाही का ? या अर्थाने विज्ञानादी इतर सर्जनव्यापारांतील शाश्वताप्रमाणे कलेतील शाश्वताला अर्थ आहे, इतकेच नव्हे, तर कलेचे कार्य या शाश्वत टिकणाऱ्या तिच्या सामर्थ्या मुळेच महत्त्वाचे मानावे लागते.

## १.६ सारांश

(१) ललितलेखकाची सर्वांत मोठी आकांक्षा आपणांस अक्षर वाङ्मयाचे निर्माते ही बहुमानाची पदवी मिळावी, ही असते. अशा अक्षर वाङ्मयकृती आपणांस पाहण्यास मिळतात म्हणून ही आकांक्षा अवास्तव ठरत नाही. अक्षर वाङ्मय निर्मात्याला आणि त्याच्या कलाकृतीला त्याचे सारे राष्ट्र मान देते; एवढेच नव्हे तर ते देशकालातीत असल्याने जगद्वंद्य ठरते.

(२) ललितसाहित्य ही प्रतिभावंताची कल्पित सृष्टी असते, म्हणजे ती 'खोटी' सृष्टी असते, असे नव्हे. उलट ती सत्याहून अधिक मोठी व खोल सत्यसृष्टी असते.

(३) ललित साहित्याच्या आस्वादाने होणारा आनंद हा पुनःप्रत्ययाचा असतो; इतर प्रकारे होणाऱ्या आनंदापेक्षा ह्या आनंदासाठीच रसिक वाचक साहित्यकृती वाचतात.

(४) अविच्छिन्न आनंद देण्याची शक्ती ज्या वाङ्मयात असते, ते वाङ्मय अक्षर ठरते.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय.

(१) 'ललितवाङ्मयाचा आद्य हेतू' या विषयावर निबंध लिहा

(२) तुम्हांला आवडलेली सर्वोत्कृष्ट कलाकृती कोणती ? ती का आवडली हे सांगणारा परिच्छेद लिहा.

(३) प्रा.फडके यांच्या त्लक पाच कादंबऱ्यांची नावे सांगा.

(४) त्यांपैकी तुम्हांला आवडलेल्या एका कादंबरीचा परिचय करून द्या.

# १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१ प्रतिमासाधन - ना.सी. फडके
२ साहित्य आणि संसार - ना.सी. फडके
३ साहित्याचे मानदंड - गंगाधर गाडगीळ